# पतसंस्थांच्या थकबाकी वसुली हितार्थ

दिनांक १९/१०/२०१० रोजी महाराष्ट्र राज्याचे प्रधान सचिव (सहकार व पणन) यांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रसिध्द केलेल्या परिपत्रकाप्रमाणे **राज्यात सुमारे १७२७८ नागरी/ग्रामीण सहकारी पतसंस्था** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणीकृत आहेत. सहकार विभागाच्या सर्वेक्षणानुसार **राज्यातील ४६९ पतसंस्था आर्थिक अडचणीत असल्याचे** निदर्शनास आलेले आहे. पतसंस्थांच्या कर्जाच्या थकबाकीचा प्रश्न शिघ्रतेने निकालात काढण्यात यावा ह्यासाठी, मा.मुख्य सचिव महाराष्ट्र शासन यांनी सहकार विभागास निर्देश दिलेले आहेत.



अ) ठेवीदारांच्या ठेवी बुडविलेल्या पतसंस्थांच्या दोषी संचालकांना व त्यात सामील असलेल्या अधिकाऱ्यांना मोक्का लावण्याबाबतची कार्यवाही सहकार विभागाने गृह विभागाच्या मदतीने करावी.

ब) ठेवी बुडविणाऱ्या दोषी संचालकांकडून ठेवीदारांच्या ठेवी वसुलीची कार्यवाही **महसुली येणे** आधारे करावी.

**उपरोक्त (अ) बाबत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येत आहे, तथापी**

**उपरोक्त (ब) चे संदर्भात महसुल विभागाचे सहकार्याने करावयाच्या कार्यवाहीबाबत पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.**

पतसंस्थांनी दिलेल्या कर्जाच्या थकबाकीची वसुली कर्जदाराकडून करुन घेण्यासाठी सहकार कायद्याच्या कलम १०१ अंतर्गत वसुली प्रमाणपत्र निबंधकांकडून संस्थांना देण्यात येते. या वसुली दाखल्याच्या आधारे कर्जाची वसुली करण्यासाठी **वसुली अधिकारी** म्हणून सहकार कायद्याच्या कलम १५६ चे अधिकार संस्थेच्या कर्मचाऱ्यास प्रदान करण्यात येतात. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे कलम १०७ मधील

नमूद पध्दतीचा अवलंब करुन कर्जाची वसुली करण्यात येते.

ज्या कर्जापोटी पुरेसे तारण आहे अशा प्रकरणी उपरोक्त पध्दतीने कर्जवसुली करणे काही अंशी शक्य होते. मात्र पुरेसे तारण नसलेल्या प्रकरणी कर्जाची वसुली करणे अडचणीचे ठरते. याचे कारण म्हणजे कर्जदार संस्थेकडून घेतलेल्या कर्ज रक्कमेतून **स्वत:चे नावे मालमत्ता निर्माण न करता आपले कुटुंबीय नातेवाईक किंवा अन्य व्यक्तीच्या नावे मालमत्ता निर्माण करतात,** स्वत:चे नावे शक्यतो कोणतीही मालमत्ता ठेवत नाही. अशा प्रकरणी कर्जदाराच्या कुटुंबीय,नातेवाईक किंवा अन्य व्यक्तींच्या नावे असलेली मालमत्ता शोधून अंकीत करुन तिची जप्ती करुन विक्री करण्यासाठी स्थानिक स्तरावर महसूल विभागाचे यंत्रणेचे सहाय्य घेणे उपयुक्त ठरेल.

कर्जदाराने स्थानिक स्तरावर कर्जातून त्याचे कुटुंबीय, नातेवाईक किंवा अन्य व्यक्तींच्या नावे संपादीत केलेली **मालमत्ता व तिच्या व्यवहाराबाबत गाव,तलाठी व ग्रामविकास अधिकारी याचे माध्यमातून माहिती प्राप्त करुन अशी मालमत्ता अंकीत करुन मिळणे सहज उपलब्ध आहे.** यास्तव पुढील सुचना देण्यात येत आहेत.

१) संबंधित सहकारी पतसंस्थांनी त्यांचेकडील कलम १०१ ची वसुली प्रकरणे जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था यांचे मार्फत जिल्हाधिकारी यांचे निदर्शनास आणावी.

२) जिल्हाधिकारी यांनी आपल्या अधिनस्त यंत्रणेमार्फत संबंधीत कर्जप्रकरणी अशी मालमत्ता शोधून अंकीत करावी.

३) अशी मालमत्ता वसुली अधिकाऱ्याने जप्त करावी आणि अशा **मालमत्तेचा जाहिर लिलाव महसूल विभागाच्या देखरेखीखाली व गृहविभागाच्या सहकार्याने करुन त्याद्वारे झालेली वसुली संस्थेच्या येणे कर्जापोटी जमा करावी.**

४) सहकार कायद्याच्या कलम ८८ अंतर्गत ज्या संस्थांविरुध्द चौकशी पूर्ण करुन वैयक्तिक जबाबदारीचे प्रमाणपत्र कलम ९८ अंतर्गत देण्यात आलेले आहे, अशा प्रकरणी रकमेच्या वसुलीची कार्यवाही संबंधीत जिल्हाधिकारी यांचे स्तरावरुन वसूल रक्कम जिल्हा उपनिबंधक, सह-संस्था यांचेमार्फत संस्थेकडे सुपूर्द करण्यात यावी.

वरील प्रमाणे सुचनांचे काटेकोर पालन करुन कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी सादर करावा.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने**

(सुधिरकुमार गोयल)
प्रधान सचिव (सहकार व पणन)

तसेच पतसंस्थांकडून कर्ज वसुलीचे अनुषंगाने **कर्जदारांकडून कोरे चेक** घेत असल्याबाबत राज्याच्या मा.सहकार आयुक्तांनी **दिनांक २४/०७/२००६ रोजी** जे परिपत्रक काढले आहे, ते जसेच्या तसे आपल्या माहितीसाठी प्रसिध्द करीत आहोत.

**परिपत्रक**

**विषय: विविध पतसंस्थांकडून कर्ज वसुलीचे अनुषंगाने कर्जदाराकडून कोरे चेक घेण्यात येत असलेबाबत**

काही पतसंस्था कर्जास तारण म्हणून कर्जदारांकडून कोरे चेक घेतात. याबाबत तक्रारी या कार्यालयास प्राप्त झाल्या असल्याने सदर तक्रारींच्या अनुषंगाने कर्जास तारण म्हणून चेक घेणेबाबत या परिपत्रकान्वये सर्व नागरी सहाकरी पतसंस्थांना खालिलप्रमाणे सूचना करण्यास येत आहेत.

**१) कर्जास तारण म्हणून संस्थेने कर्जदाराकडून कोरे चेक (केवळ कर्जदाराची सही असलेले चेक) स्विकारु नये.**

**२) कर्जास तारण म्हणून कर्जदाराकडून चेक स्विकारताना सदरचे चेक हे संबंधित कर्जदाराकडून त्यांचे हस्ताक्षरात पूर्णपणे भरुन (दिनांक,रकमेचा लेखी व अक्षरी तपशील,संस्थेचे नाव व सही) घेऊनच स्विकारण्यात यावेत.**

**३) कर्जदाराकडून अशाप्रकारे त्याचे हस्तक्षरात पूर्णतः चेक भरुन स्विकारलेनंतर कर्जदाराकडून खालील नमुन्यात पतसंस्थेचा फॉर्म भरुन घ्यावा.**

## नमुना

मी............................रा.......................................नागरी सहकारी पतसंस्थेकडून रु............................................... (अक्षरी रूपये ............................)इतक्या रकमेचे कर्ज घेतलेले असून सदर कर्जास तारण म्हणून ....................... या नागरी सहकारी / जिल्हा मध्यवर्ती सहकारी /राष्ट्रीयकृत बँकेचे चेक नं........... ते .............. या क्रमांकाचे एकुण ...........चेक्स मी घेतलेल्या कर्जास तारण म्हणून सदर पतसंस्थेस मी माझ्या स्वहस्ताक्षरात पूर्णपणे भरुन (दिनांक,रकमेचा लेखी व अक्षरी तपशील, संस्थेचे नांव) व स्वाक्षरी करुन दिलेले आहेत.

**सर्व विभागीय सहनिबंधक/ जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, सदर बाब आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व पतसंस्थांच्या निदर्शनास आणून द्यावी व आपल्या विभागामध्ये,जिल्ह्यामध्ये सदर परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही होईल असे पहावे.** त्याबाबतची संपूर्णपणे जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

मा.सहकार आयूक्त यांचे मान्यतेने

सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे करीता.

तसेच राज्यातील नागरी सहकारी बँका व **पतसंस्थांमधील थकबाकी वसुली अनुषंगाने वसुली अधिकाऱ्यांसमवेत पोलिस उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात** दिनांक २५/१०/२०१० रोजी जे परिपत्रक शासनामार्फत काढलेले आहे, ते जसेच्या तसे प्रसिध्द करीत आहोत.

# महाराष्ट्र शासन

गृहविभाग

शासन परिपत्रक क्रमांक-सीआयआय०१०८/प्र.क्र.११/पोल-१२,

मंत्रालय, मुंबई - ४०००३२, **दिनांक २५ ऑक्टोंबर २०१०**

पहा : शासन निर्णय-सीआयआय ०१०८/प्र.क्र.११/पोल-११, दिनांक ४ जानेवारी २००८

प्रस्तावना :

शासनाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये राज्यातील नागरी सहकारी बँका व सहकारी पतसंस्थांमधील कर्जवसुलीचे अनुषंगाने कार्यवाही करताना पोलीस संरक्षण व फौजदारी कामी सहकार्य करुन समन्वय राखण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले होते. सोबत सुलभ प्रत जोडली आहे. **सदर परिपत्रकातील सूचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे सर्व संबंधितांनी करावी.**

आता महाराष्ट्र राज्याती नागरी सहकारी बँका व सहकारी पतसंस्था यांच्या पदाधिकाऱ्यांनी दिनांक १५ ऑक्टोंबर,२०१० रोजी मा.मंत्री (गृह),मा.सहकार राज्यमंत्री यांच्या समवेत झालेल्या बैठकीमनध्ये शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, नागरी सहकारी बँकांचे वसुली अधिकारी वसुलीसाठी कर्जदाराच्या निवासस्थानी / कार्यालयात जेव्हा जेव्हा जातात तेव्हा, **संबंधीत कर्जदार आपल्या कुटुंबातील महिलांना पुढे करुन वसुली थांबविण्याचा प्रयत्न करतात**. पर्यायाने वसुलीच्या कामात अडथळे निर्माण होतात. ही बाब विचारात घेता, शासन आता खालीलप्रमाणे नव्याने आदेश देत आहे.

**१) सर्व जिल्हा अधिक्षक/पोलीस आयुक्त यांनी सहकारी बँक / पतसंस्था यांचेकडून वसुलीच्या कामासाठी पोलीस संरक्षणाची मागणी केल्यास तातडीने त्याची पुर्तता करावी.**

**२) बँकांच्या सुरक्षीततेच्या अनुषंगाने प्रत्येक सहकारी/राष्ट्रीयकृत बँकांनी आपले सुरक्षा ऑडीट करुन घ्यावे.**

**३) सर्व पोलीस घटक प्रमुखांनी पोलीस आयुक्त / जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सहकारी बँक/ राष्ट्रीयकृत बँका/ पतसंस्था यांचे समवेत दर तीन महिन्यातून एकदा आढावा बैठक घ्यावी. संरक्षणातील अडीअडचणी समजून घ्याव्यात व त्यावर उपाययोजना करावी.**

**४) सुरक्षिततेच्या अनुषंगाने भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांची काटेकोरपणाने अंमलबजावणी बँकांनी करावी.**

**५) सहकारी बँका/पतसंस्था यांनी पोलीस खात्यातील कर्ज घेतलेल्यांपैकी थकबाकीदारांची यादी अतिरीक्त पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) यांचेकडे वेळोवेळी पाठवावी. जेणेकरुन त्याबाबत कार्यवाही करता येईल.**

वरील सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने**

(प्रवीण दिक्षित)

प्रधान सचिव (विशेष), महाराष्ट्र शासन

ह्या अग्रलेखात फार महत्वाच्या शासकीय परिपत्रकांची माहिती पतसंस्थांच्या थकीत कर्जवसुलीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याचा पुरेपूर उपयोग आणखी करुन घेण्यासाठी **बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित**, मुंबईच्या www.mahasahakar.com ह्या वेबसाईटवर ही संबधीत सर्व परिपत्रके उपलब्ध आहेत याची सुध्दा कृपया नोंद घ्यावी.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**